REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.
प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*
वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.
किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*
कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–
"अर्थ"
*"दुर्गाधिवास"* पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ६ एप्रिल, १९४९ अंक १४

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादींसाठी चौकशी कराः—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

५, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५११

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज्
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)
(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
(लेः—जे. बी. टेलर, किं. १ रु.)
(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
(लेः—. रेवि ॲले, किं. २ रु.)

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.**

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १९,७०,०००रु वर

★ बँक स्ट्रीटवर ★

२,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शिव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ भांद्रा, १५ कडाक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०१ वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें






## सर्व प्रसिद्ध माल

सिमेंट कॉंक्रीट पाइप्स, ऑर्डरप्रमाणें.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**मुंबई प्रांतांतील धान्य उत्पादनाची मोहीम**—मुंबई विधिमंडळांतील कॉंग्रेस पक्षाची सभा नुकतीच भरली होती. प्रांतांतील अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेची कितपत प्रगति झाली त्याची चौकशी करण्यासाठी एक कमिटी पक्षानें नेमली आहे. श्री. बापूसाहेब गुप्ते हे ह्या कमिटीचे अध्यक्ष आहेत. ह्या कमिटीनें शेतकी खातें आणि नागरी पुरवठा खातें ह्या खात्यांशीं विचारविनिमय करून प्रांतांतील धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी उपाय सुचवावयाचे आहेत. धान्यावरील नियंत्रण एप्रिल १९५० पर्यंत चालू ठेवण्याच्या मध्यवर्ती सरकारच्या धोरणाला पक्षसभेंत पाठिंबा देण्यांत आला.

**मद्रास प्रांतांतील विजेचा पुरवठा**—मद्रास प्रांतांतील मेट्टूर धरणामधील पाण्याचा साठा पावसाच्या कमतरतेमुळें कमी झाला आहे; आणि त्याचा परिणाम म्हणून विजेची निर्मिती कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही परिस्थिति जून १९४९ पर्यंत तरी सुधारण्याची शक्यता नाहीं. गेल्या वर्षीच्या विजेच्या वापराच्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक युनिटला दुप्पट आकार ह्या वर्षी घेण्यांत येणार आहे.

**विजगापट्टम येथील कारखाना बंद**—शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें आपला विजगापट्टम येथील बोटी बांधण्याचा कारखाना बेमुदत बंद ठेवण्याचें ठरविलें आहे. नवीन बोटी बांधण्याचें काम स्थगित झाल्यामुळें ३५० कामगारांना बडतर्फीच्या नोटिसा देण्यांत आल्या आहेत. ह्या कारखान्यांत बांधलेली 'जल-उषा' ही पहिली बोट सध्या चालू आहे. इंग्लंडमध्यें ८,००० टन वजनाचें जहाज बांधण्यास हल्लीं ३५ ते ४० लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. हिंदुस्थानांत ह्याच बोटीला ६५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं केला आहे.

**सोडा ॲशच्या आयातीचे परवाने रद्द**—डॉलर्ससारख्या दुर्लभ परकीय हुंडणावळीची चणचण भासत असल्यामुळें वरील चलन असणाऱ्या देशांतून सोडा ॲश आयात करण्याचे परवाने हिंदुस्थान सरकारनें रद्द केले आहेत. ३१ मार्च, १९४९ पर्यंत आयातीबद्दल जीं पतीचीं पत्रें दिलीं गेलीं असतील तेवढी आयात मात्र होऊं दिली जाईल. सोडा ॲशचा पुरवठा उद्योगधंद्याला पुरेसा होण्यासाठी सरकार जरूर तितकी आयात वेळोवेळीं करीत रहाणार आहे.

**नवीन ध्वनिक्षेपणाचीं केंद्रें**—मुंबई, मद्रास आणि नवी दिल्ली ह्या शहरांतून तीन नवीं रेडिओ केंद्रें उघडण्यासाठी हिंद सरकारनें वेस्टिंग हौस ह्या अमेरिकन कंपनीकडून १० लाख डॉलर्सचें साहित्य विकत घेतलें आहे. मुंबई केंद्राचें साहित्य मुंबईला आलें असून केंद्राच्या उभारणीसाठी कंपनीचा एक तज्ज्ञहि नुकताच विमानानें मुंबईला आला आहे.

**हिंदुस्थानला होणारा गव्हाचा पुरवठा**—वॉशिंग्टन येथें आंतरराष्ट्रीय गव्हाच्या करारावर नुकत्याच सह्या करण्यांत आल्या. ह्या कराराप्रमाणें हिंदला दरवर्षी १० लाख टन गहू मिळण्याची निश्चिती झाली आहे. गव्हाच्या कमाल व किमान किंमतीहि ठरविण्यांत आल्या आहेत. सध्या हिंदला दर मणाला १५ रुपये किंमत द्यावी लागते. करारा प्रमाणें जास्तींत जास्त १० रुपये ६ आणे आणि कमींत कमी ७ रुपये ३ आणे किंमत द्यावी लागेल. ह्या करारामुळें हिंदमध्यें गव्हाऐवजीं तांदूळ अधिक पिकविण्यास जमिनीचा उपयोग करता येईल.

**हैद्राबादमध्यें ६०० नवीन शाळा**—चालू वर्षाच्या जून अखेर हैद्राबाद संस्थानांत ६०० नवीन प्राथमिक शाळा उघडण्याचें हैद्राबाद सरकारनें ठरविलें आहे. ह्या शाळा प्रयोगादाखल सुरू करण्यांत येत असून त्यांमधून शिक्षणाचें माध्यम स्थानिक भाषा राहणार आहे. नवीन शाळा भरविण्यासाठीं १२० झोंपड्या बांधण्यांत येणार आहेत. त्यासाठीं १,२०,००० रुपये खर्च येईल.

**आसामधील जमीनदारी बिल मंजूर**—आसाम प्रांतांतील जमीनदारी रद्द करण्यासंबंधींचें बिल आसाम विधिमंडळांत नुकतेंच मंजूर झालें. ह्या बिलान्वयें सरकार जमीनदारांच्या जमिनी नुकसानभरपाई देऊन आपणांकडे घेणार आहे.

**पोलंड-हिंद व्यापारी वाटाघाटी**—पोलंडचें एक व्यापारी प्रतिनिधिमंडळ सध्या पाकिस्तानमध्यें आलें आहे. पाकिस्तानांतून हें मंडळ व्यापारी वाटाघाटी करण्यासाठी दिल्लीला येणार आहे. मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्याशीं विचारविनिमय केल्यावर प्रतिनिधिमंडळ कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादि औद्योगिक शहरांना भेटी देणार आहे.

**इजिप्तमधील कापड गिरण्यांची अडचण**—इजिप्तच्या सरकारनें मदत केली नाहीं तर तेथील गिरण्यांना उत्पादन कमी करून २ लाख कामगारांना बडतर्फ करावें लागेल असें समजतें. परदेशांतून होणारी कापडाची आयात, इजिप्तमधील कापसाची चढी किंमत आणि कारखानदारांवर सरकारनें घातलेलीं बंधनें ह्या कारणांमुळें इजिप्तमधील कापडाच्या गिरण्या अडचणींत सांपडल्या आहेत.

**हिंद-रशिया करार**—हिंद सरकारनें रशिअन गव्हाच्या मोबदल्यांत रशियाला चहा पुरविण्याचा करार केलेला आहे. ह्या कराराप्रमाणें हिंदनें ५,००० टन चहा पुरवावयाचा आहे. त्यापैकी चार पंचमांश चहा उत्तर हिंदुस्थानांतील मळ्यांनीं आणि उरलेला दक्षिण हिंदमधील मळ्यांनीं पुरवावा अशी मागणी सरकारतर्फे करण्यांत आली होती. तथापि मळेवाल्यांकडून ह्या मागणीचें योग्य स्वागत झालेलें नाहीं. मागणीसंबंधीच्या अटी नीट समजून घेण्यास आपणांस वेळ मिळाला नाहीं आणि कांहीं विशिष्ट दर्जाचाच चहा घेण्याचा रशिआचा आग्रह ह्या दोन कारणांमुळें कराराप्रमाणें पुरवठा करणें कठीण जात आहे असें कळतें.

**तागाच्या नव्या प्रकाराचा शोध**—सोव्हिएट रशिआच्या शास्त्रज्ञांनीं थंडीला दाद न देणाऱ्या एका नव्या प्रकारच्या तागाचा शोध लावला आहे. रशियांत ह्यापूर्वी ताग होत नसे. सध्या ह्या तागाचें पीक मध्य-आशिआ, ट्रॅन्सकॉकेशिआ इत्यादि प्रदेशांतून काढण्यांत येत आहे. कुबन खोऱ्यांत काढण्यांत येणाऱ्या ह्या तागाचें एकरीं पीक हिंदुस्थानपेक्षा कमी नाहीं असें समजतें. तागाच्या पिकाला उष्ण हवा लागत असल्यामुळें थंड कटिबंधांत त्याची लागण करणें शक्य होत नव्हतें.

# अर्थ

बुधवार, ता. ६ एप्रिल १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## मॅनेजिंग एजंटांच्या कराराची शाश्वती

१४ मार्च, १९४९ रोजीं कुलाबा लँड अँड मिल कं. लि. मुंबईच्या विशेष साधारण सभेनें कंपनीची मॅनेजिंग एजन्सी, तिची मुदत संपण्यापूर्वींच ८½ वर्षे आधीं रद्द करण्याचा ठराव मंजूर केला. सभेस प्रत्यक्ष उपस्थित असणाऱ्या भागीदारांपैकीं बहुसंख्य लोक ठरावाच्या विरुद्ध होते. परंतु, पोल मागण्यांत आल्यावर ठरावाच्या बाजूस २८,३६८ मतें पडलीं व विरुद्ध बाजूस फक्त ९,१८७ मतें मिळालीं. ३७ भागीदारांजवळच ठरावास अनुकूल असलेलीं २८,३६८ मतें एकत्रित झालेलीं होतीं. विरुद्ध बाजूचीं ९,१८७ मतें ३६३ भागीदारांत विभागलेलीं होतीं. अशा रीतीनें, मेसर्स डब्ल्यू. एच. ब्रॅडी अँड कंपनी लि. कडे असलेली मॅनेजिंग एजन्सी तिच्या हातची जाऊन, तीन वर्षे चालूं असलेल्या झगड्यामध्यें बहुसंख्य भाग धारण करणाऱ्या मूठभर लोकांस यश प्राप्त झालें आहे. ब्रॅडी कंपनीनें कुलाबा कंपनीची ४८ वर्षें उत्कृष्ट सेवा केली होती आणि तिला काढून टाकते वेळीं कुलाबा कंपनीला बरीच मोठी रक्कम नुकसानभरपाईदाखल द्यावी लागेल, हें उघड आहे.

"ज्या पद्धतीनें वरील मॅनेजिंग एजन्सी रद्द झाली ती पद्धत व रद्द करण्यांत आलेल्या मॅनेजिंग एजन्सी फर्मची सेवा हीं लक्षांत घेतां, व्यापारी वृत्तीचे उच्च आदर्श ठेवूं इच्छिणारांस वाईट वाटल्याशिवाय राहणार नाहीं—हिंदुस्थानातील जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या पद्धतीमध्यें पडूं पहाणारी प्रथा अत्यंत अनिष्ट स्वरूपाची आहे, आणि तिला वेळींच आळा घालण्यांत आला नाहीं, तर आपल्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीस पायबंद बसल्याखेरीज राहणार नाहीं. पैसेवाले (गेल्या कांहीं वर्षांत कित्येकांनीं बेसुमार पैसा 'कमावला' आहे) लोक केवळ पैशाच्या जोरावर उद्योगधंद्यांतील जुन्या व कार्यक्षम लोकांना बाहेर ओढूं लागले, तर नवे उद्योगधंदे उभारण्यास सच्चे लोक पुढें कसे येणार? देशी भांडवलासच नव्हे तर परदेशी भांडवलासहि आपणांस आपल्या उद्योगधंद्याकडे आकर्षावयाचें आहे. अशा वेळीं, जागरूकपणें अधिकारी वर्गानें आपलें वजन सच्चेपणाच्या बाजूनेंच खर्च केलें पाहिजे" कॉमर्स साप्ताहिकानें वरीलप्रमाणें विचार ह्या प्रकरणीं व्यक्त केले आहेत.

महाराष्ट्रांतील कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट बहुसंख्य भाग धारण करण्याइतके किंवा आपल्या नियंत्रणाखालीं ठेवण्याइतके श्रीमंत किंवा प्रबळ क्वचितच असतात. मॅनेजिंग एजंटांचे खिशांत ५१% मतें असल्याखेरीज त्यांचें स्थान सुरक्षित राहूं शकत नाहीं, हें कुलाबा-ब्रॅडी प्रकरणानें सिद्ध केलें आहे. कंपनी कायद्याप्रमाणें, आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील अगदीं किरकोळ बदलासहि तीन-चतुर्थांशाचें मताधिक्य लागतें; परंतु मॅनेजिंग एजन्सी बदलण्यास साधें ५१% मताधिक्य पुरतें; त्याला स्पेशल ठराव लागत नाहीं. मॅनेजिंग एजंटाची नेमणूक आर्टिकल्स ऑफ असोसिएशननें केली असली, तरी भागीदारांच्या साध्या ठरावानें ती रद्द होऊं शकते. हें टाळण्यासाठीं कांहीं मॅनेजिंग एजंट आपल्या नेमणुकीच्या करारांतच, एजन्सी रद्द करण्यास तीन-चतुर्थांशाचें मताधिक्य आवश्यक असल्याचें नमूद करून घेतात. मॅनेजिंग एजंट बदलण्यास साधें मताधिक्य पुरें असणें एजंटांच्या दृष्टीनें हितकारक नाहीं. केवळ पैशाच्या पाठिंब्यानें मॅनेजिंग एजन्सीचा ताबा घेणारे लोक कार्यक्षम किंवा अनुभवी असतातच, असें नाहीं. शिवाय, हे लोक आपले पैसे वसूल करण्यासाठीं कंपनीच्या इतर भागीदारांच्या हितास बाधक होणारीं कृत्यें करण्यास केव्हांहि तयार होणें स्वाभाविक असतें. म्हणजे, अशा व्यवहारापासून नव्या मॅनेजिंग एजंटाचा फायदा झाला तरी त्याचा सामान्य व गरीब भागीदारांवर भुर्दंड पडतो. मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीमधील कित्येक अनिष्ट प्रथा, एजंटांना मताधिक्य नसतानाहि, आपल्या प्रत्ययास आजहि येतात. तेव्हां, ५१% पेक्षा अधिक भाग पैदा करून यशस्वी कंपन्यांचेवर ताबा मिळविणाऱ्या मॅनेजिंग एजंटांना मताधिक्याचे जोरावर गैरकृत्यें करण्यास जास्त वाव मिळूं न देणें इष्टच होणार आहे.

## निर्वासितांची व्यवस्था

हिंदुस्थानच्या फाळणीनंतर पाकिस्तानांतून हिंदी नागरिकांची फार मोठी संख्या निर्वासित म्हणून हिंदुस्थानांत आली. त्यांची व्यवस्था लावण्यासाठीं हिंद सरकारनें एक स्वतंत्र संघटना ता. १ जून १९४८ पासून स्थापन केली. ह्या संघटनेचें काम अध्यक्ष, तीन सरकारी अधिकारी आणि तीन सरकारनें नेमलेले पण अधिकारी नसलेले गृहस्थ, ह्यांच्या संयुक्त कारभाराखालीं चालतें. मध्यवर्ती सरकार जास्तींत जास्त १० कोटी रुपये संघटनेच्या हवालीं करील. ह्या रकमेंतून ५ हजार पासून ५०,००० रुपयांपर्यंत अर्जाप्रमाणें कर्जें देण्यांत येतात. सहकारी संस्था अगर संयुक्त भांडवलाच्या संस्था ह्यांना १ लाख रुपयांपर्यंतहि कर्ज मिळूं शकतें. आतांपर्यंत ८० लाख रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं आहेत. ह्या संघटनेच्या शाखा सिमला, मुंबई, कलकत्ता आणि लखनौ येथें १ एप्रिल १९४९ पासून व्यवस्थित रीतीनें काम करूं लागतील अशी अपेक्षा आहे.

## पश्चिम बंगालमधील बँका

सप्टेंबर १९४८ अखेर पश्चिम बंगालमधील बँका कांहींशा अडचणींत सांपडल्या होत्या. ठेवीदारांनीं आपल्या ठेवी एकदम परत मागण्यास प्रारंभ केल्यामुळें बँकांवर ही आपत्ति ओढवली होती. रिझर्व्ह बँकेनें अडचणींत सांपडलेल्या बँकांना ३½ कोटी रुपयांपेक्षां अधिक कर्जें दिलीं; तरी पण ४ बँकांना आपले व्यवहार बंद करावे लागले. असे प्रसंग आल्यास रिझर्व्ह बँकेला इतर बँकांना मदत करतां यावी म्हणून, आणि ठेवीदारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याची सत्ता रिझर्व्ह बँकेला असावी म्हणून, सप्टेंबर १९४८ मध्यें बँकिंग बिलांतील कांहीं कलमांचा एक वटहुकूम काढण्यांत आला. कारण त्यावेळीं बँकिंग कंपनीज बिल मंजूर झालेलें नव्हतें. त्यानंतर बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें आहे.

## संयुक्त महाराष्ट्र कारखानदार व व्यापारी परिषद

### निरनिराळ्या धंद्यांच्या उप-परिषदा

वरील परिषद ८, ९, १० व ११ एप्रिल रोजीं पुणें येथें भानुविलास नाट्यगृहांत भरणार आहे. अध्यक्षस्थानीं दि. ब. बी. पी. जगताप ह्यांची योजना करण्यांत आली असून श्री. म. व्यं. उर्फ काकासाहेब शिंगरे हे स्वागताध्यक्ष आहेत. मुख्य परिषदेबरोबर कांहीं उप परिषदाहि भरविण्याचें ठरलें आहे: ( १ ) ऊंस व गूळ बागाइतदार, ( २ ) तंबाखू व विडी व्यापारी, ( ३ ) हातमाग व विणकर, ( ३ ) औषधी कारखानदार व व्यापारी, ( ४ ) कातडी मालाचे कारखानदार व व्यापारी, ( ५ ) वहातूक व ( ६ ) मोलपट.

### पोष्टाचे नवे दर

( १ एप्रिल, १९४९ पासून चालू )

पाकिटें : १ तोळयास २ आणे
२ तोळयांस ३ आणे
३ तोळयांस ४ आणे, ह्या प्रमाणें

कार्डें : ३ पैसे.

एअर मेल : जादा फी घेतली जाणार नाहीं. सर्व पत्रें व पाकिटें शक्य तेथें विमानांनीं पाठविलीं जातील. रजिस्टर्ड जिन्नस विमान मार्गें जातील परंतु इन्शुअर्ड जिन्नस जाणार नाहींत.

### टांकसाळी

सध्या हिंदुस्थानांत दोन टांकसाळी आहेत; एक मुंबईला आणि दुसरी कलकत्त्याला. त्यापैकीं कलकत्त्याची टांकसाळ शंभर वर्षांची जुनी असल्यानें आधुनिक गरजा भागविण्यासारखी नाहीं. अलीपूर येथें एक नवीन टांकसाळ उभारण्यांत येत आहे. तींतच कलकत्ता येथील टांकसाळीचा अंतर्भाव करण्यांत येईल. ह्या नवीन टांकसाळीसाठीं २ कोटी रुपये खर्च येईल. अलीपूर आणि मुंबई ह्या दोन्ही ठिकाणच्या टांकसाळींत नवी यंत्रसामुग्री बसाविण्यांत येणार आहे. दोन्ही टांकसाळींत आणि सिक्युरिटी प्रेसमध्यें वरिष्ठ जागांवर आतांपर्यंत ब्रिटिश लष्करी अधिकारी असत. त्यांच्यापैकीं कांहीं जणांना थोड्या मुदतीच्या करारानें कामावर ठेवण्यांत आलें आहे. हिंदी वरिष्ठ नौकरांना शिक्षण देऊन तयार करण्यांत येत आहे. ते तयार झाले म्हणजे ब्रिटिश अधिकाऱ्यांना रजा देण्यांत येणार आहे.

### कंपन्यांच्या डायरेक्टरांची स्वहित संवर्धक संघटना

( आपल्या कंपन्यांच्या डायरेक्टरांवर नव्या नव्या जबाबदाऱ्या येत आहेत, परंतु त्यांचें योग्य मार्गदर्शन होऊं शकत नाहीं. इंग्लंडमधील डायरेक्टरांच्या संघटनेची खालील माहिती त्यांना उद्बोधक वाटेल. )

चालू घडामोडी आणि कायद्याचा कल हीं लक्षांत घेतां, कंपन्यांचे डायरेक्टर राष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक जीवनांत किती महत्त्वाचें कार्य करीत आहेत, ह्याची जनतेला माहिती करून देणें अगत्याचें झालें आहे. त्यासाठीं कंपन्यांच्या डायरेक्टरांची "दि इन्स्टिट्यूट ऑफ डायरेक्टर्स" ही संस्था १९०३ सालीं ग्रेटब्रिटनमध्यें स्थापन होऊन तिला १९०६ सालीं रॉयल चार्टर मिळाला; म्हणजे ती आतां ४५ वर्षें अस्तित्वांत आहे. परंतु आतां तिला अधिक नेटानें आपलें काम करण्याची आवश्यकता भासत आहे. माहिती पुरवणें, डायरेक्टरांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या गोष्टी त्यांचेकडे वरचेवर पाठविणें, इत्यादि बाबी त्या संस्थेच्या कार्यक्रमांत आहेत. नव्या कंपनी कायद्यानें डायरेक्टरांवर आणखी जबाबदाऱ्या टाकल्या आहेत, त्या आपल्या सभासदांना समजावून सांगणें हें त्या संस्थेच्या कामांतच येतें. कायद्यांतील योजना डायरेक्टरांना जाचणार असतील, तर त्याबाबत योग्य त्या प्रकारें विरोध ही संस्था करते. डायरेक्टर आणि व्यवस्थापक ह्यांचेमधील संबंध, व्यवस्थापक आणि कामगार ह्यांचेमधील संबंध, कामगारांच्या सुखसोई, इत्यादि प्रश्नहि इन्स्टिट्यूटच्या कक्षेंतील आहेत. इन्स्टिट्यूट कायद्यांना विरोध करील त्यांत राजकीय विचारसरणीस वाव रहाणार नाहीं. तिच्या सभासदांचें राजकीय मत डायरेक्टरांच्या व्यापक हितसंबंधांचे आड येऊं दिलें जाणार नाहीं. "संधि मिळण्याचे बाबतींत समता हवी, परंतु वैयक्तिक उत्कर्षाचें ध्येय स्वाभाविक समजलें पाहिजे; तो सामाजिक गुन्हा नाहीं" असें इन्स्टिट्यूटचें धोरण आहे. येत्या बारा महिन्यांत इन्स्टिट्यूट १०,००० नवे सभासद मिळविण्याचा प्रयत्न करणार आहे.

### युनियन आणि हिंद बँकांचें एकत्रीकरण

युनियन बँक ऑफ इंडिया ( मुंबई ) व हिंद बँक ( कलकत्ता ) ह्यांचें एकत्रीकरण होण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. युनियन बँक हिंद बँकेची सर्व जिंदगी, व्यवहार व गुडविल विकत घेईल आणि तिच्या सर्व देण्यांची जबाबदारी स्वतः पत्करील. युनियन बँक नवे शेअर्स काढून कराराप्रमाणें ते हिंद बँकेच्या भागीदारांस देईल. युनियन बँकेची स्थापना १९१९ सालीं झाली. तिची मुख्य कचेरी मुंबई येथें आहे. हिंद बँकेची स्थापना १९४३ सालाची आहे.

## कंपनीचे अध्यक्ष म्हणाले :

### दि नॅशनल बँक ऑफ इंडिया

"व्यापारी वर्गांत विश्वास निर्माण करण्यासाठीं शक्य ते प्रयत्न संबंधित सरकारें करतील अशी मी आशा बाळगतों. त्यांत निदान दोन गोष्टी आवश्यक आहेत: ( १ ) जोखीम पत्करण्यास कमी निरुत्साही करणारें कर-विषयक धोरण पत्करणें आणि ( २ ) कामगारांच्या मागण्या व त्या मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न ह्या बाबतींत मालक वर्गाशीं अधिक सहानुभूतीनें वागणें. सरकार हेंहि स्वतः मोठ्या प्रमाणावर कामगार नेमणारा मालक असल्यानें, अशा धोरणाची न्याय्यता आणि स्वतःच्या खर्चांत काटकसर करण्याची आवश्यकता त्यास हळुहळु पटत असावी, असें वाटतें."

मि. जे. के. रिथी.

### दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया

"बँकिंगच्या नव्या कायद्यानें बरींच नवीं नियंत्रणें घातलीं असून रिझर्व्ह बँकेस नियमनाचे व्यापक अधिकार दिले आहेत. कांहीं थोड्या बँकांच्या गैर व्यवहारांस आळा घालण्यासाठीं एकजात सगळ्याच बँकांवर बंधनें बसविण्यांत आलीं आहेत. २१ व्या कलमानें, बँकांनीं कर्जविषयक धोरण कोणतें ठेवावें हें ठरवून देण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेस दिला आहे. कर्जाचें प्रयोजन, तारणावरचें मार्जिन, व्याजाचा दर, इत्यादि बाबतींत रिझर्व्ह बँक हुकूम सोडूं शकणार आहे. अगदीं भरमसाट व बुडव्या व्यवहारांचे बाबतींतच ह्या अधिकाराचा उपयोग केला जाईल, अशी मला आशा आहे. एकंदरीनें पहातां, बँकिंग कायद्यानें हिंदी बँकिंगची उभारणी भक्कम होण्यास मदतच होईल."

श्री. एच. पी. मोदी.

## हिंदुस्थानांतील गुळाचा धंदा
### ( २ )

( ह्या लेखाचा पहिला भाग ता. १६ मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. )

**कमी खर्चांत चांगल्या दर्जाचा गूळ कसा होऊं शकेल ?**

ऊंस चरकांत घालून गाळण्याच्या चालू पद्धतींत चरक फिरविण्यास जी प्रेरकशक्ती लागते ती डिझेल तेलाच्या जळणावर चालणाऱ्या एंजिनाकडून मिळते. गेल्या महायुद्धकालांत आणि हल्लींसुद्धा हें तेल मिळविणें अतिशय बिकट झालें आहे. त्यामुळें, शेतकऱ्याला पुष्कळदा तेलाची खरेदी काळ्या बाजारांत करावी लागते. काळ्या बाजारांत अर्थातच तेलासाठी भलतीच किंमत द्यावी लागते. डिझेल तेल सुलभतेनें मिळूं शकत असलें तरीसुद्धा त्याची किंमत म्हणजे शेतकऱ्याच्या पैशाला लागलेली एक प्रकारची गळतीच होय. श्री. फणसळकरांच्या नवीन पद्धतींत ऊंस पिळून झाल्यावर जीं चिपाडें रहातात त्यांचा दोन प्रकारांनीं उपयोग करण्यांत आलेला आहे. चरकाला लागणारी प्रेरकशक्ती चिपाडाच्या जळणामुळें मिळतेच; आणि शिवाय गुळाचें यंत्र चालविण्यासाठी व रस जरूर तितका आळविण्यासाठीही चिपाडांचा उपयोग करण्यांत येतो. कारखान्याला लागणारी वीज सुद्धां ह्याच प्रेरकशक्तीच्या साह्यानें उत्पन्न होऊं शकते. गूळ तयार करण्याच्या जुन्या व नव्या पद्धतींसंबंधीं दोन कोष्टकें शेवटीं दिलीं आहेत. त्यावरून असें दिसून येईल कीं, नव्या पद्धतींत दर आधणामागें ३ रुपयांची बचत होते. ही बचत कामगारांना भरपूर वेतन देऊनही होऊं शकते. दर हंगामांत सरासरी ६,००० आधणें उकळलीं जातात अशी कल्पना केली तर नव्या पद्धतींत ही बचत १८ हजार रुपये इतकी होते. धंद्यांतील एकूण भांडवलाशीं ह्या बचतीचें प्रमाण जवळजवळ १२ टक्के पडतें.

साखरेच्या कारखान्यांचा असा अनुभव आहे कीं डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुआरी महिन्यांत साखरेचा उतारा बराच अधिक पडतो. गुळाच्या बाबतींतहि असेंच आहे. काहिलींतील रस आटवून नोव्हेंबर महिन्यांत गुळाचे सहा खडे होऊं शकले तर जानेवारींत आणि फेब्रुआरींत ते आठ किंवा नऊ होतात. ह्याचें कारण, ह्या तीन महिन्यांत उंसाचें पोषण पूर्ण झालेलें असतें, हें होय. तेव्हां ह्या तीन महिन्यांतच गुळासाठी ऊंस गाळला गेला तर गुळाची निर्मिती तेवढ्याच उंसांत अधिक होते. फेब्रुआरी महिन्यानंतर ऊंस शेतांत तसाच राहिला तर तो खराब होतो आणि त्यांतील साखरेचा भाग कमी होऊं लागतो. नव्या पद्धतींत कारखाना २४ तास अहोरात्र चालतो. त्यामुळें जास्तींत जास्त ऊंस अगदी थोड्या काळांत गाळून होतो. नव्या पद्धतींत ६,००० आधणें १२० दिवसांत पुरीं होऊं शकतात. सध्याच्या पद्धतींत त्यासाठी जवळ जवळ १ लाख रुपये खर्च येतो. नव्या पद्धतींत सर्व क्रिया यांत्रिक तऱ्हेनें होत असल्यामुळें रस चांगला शुद्ध केला जातो आणि गूळ एकाच व चांगल्या दर्जाचा तयार होऊं शकतो. चालू पद्धतींत गुळव्या हा उकळण्याकडे तर लक्ष देतोच; पण त्याशिवाय मळी काढणें आणि रस ठराविक घनतेपर्यंत आळला कीं नाहीं हें पहाणें हींही कामें करतो. अर्थात् गुळाचा दर्जा गुळव्याच्या कार्यक्षमतेवर अवलंबून रहातो. एकाच गुळाच्या कारखान्यांत निरनिराळ्या दर्जाचा गूळ तयार होतो त्याचें कारण हेंच होय. नव्या पद्धतींत मळी काढणें, रस उकळणें इत्यादि कामें निरनिराळ्या माणसांकडे सोंपविलीं जातात. त्यामुळें गुळाचा दर्जा एकसारखा रहातो. गूळ बाजारपेठेंत पाठवितांना ह्या सुधारणेचा फार चांगला उपयोग होतो. कारण, एकाच दर्जाचा गूळ निघत असल्यामुळें नमुना दाखवून त्याप्रमाणें गुळाच्या पुरवठ्याचे करार करणें सोपें जातें. सध्याच्या पद्धतींत गूळ उकळण्याचें काम जवळ जवळ उघड्यावरच होतें. त्यामुळें, वाऱ्याच्या झोताबरोबर येणारी धूळ आणि काहिलीच्या खालच्या भट्टींतून उडणारी राख, इत्यादि घाण रसांत पडते. शिवाय माशाही भरीला असतातच. नव्या पद्धतींत सर्व काम बंदिस्त इमारतींत होत असल्यामुळें गूळ स्वच्छ आणि आरोग्यदृष्ट्या चांगला तयार होतो. जुन्या पद्धतींत आधणाच्या चुल्यासाठी चिपाडांचें जळण पुरेसें होत नाहीं. त्यासाठी उसाच्या पानांचा वाळलेला पाचोळा भरीला घ्यावा लागतो. हा पाचोळा वजनानें हलका असल्यामुळें त्याची शेतांतून चुलाणाकडे वहातूक करणें बरेंच खर्चाचें होतें. केवळ वहातुकीच्या खर्चाचाच प्रश्न असता तर तो मोठीशी बाद नाहीं. पण ह्या पाचोळ्याचा उपयोग खत करण्यासाठीं फार चांगला होतो असें सरकारी प्रयोग केंद्रांच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. इतर खतांच्या मानानें उंसाच्या पाचोळ्यापासून केलेल्या खतांत ५० टक्के अधिक नैट्रोजन असतो. हाच पाचोळा जर जमिनींतच कुजूं दिला तर जमिनीचा कस वाढतो. जाव्हांत उंसाचें पीक कापल्यावर शेतांत कांहीं एका विशिष्ट पद्धतीनें चर खणण्यांत येतात आणि त्यांत हा पालापाचोळा कुजविण्यांत येतो. नव्या पद्धतींत जळणाला चिपाडें पुरीं पडतात, आणि उंसाचा पालापाचोळा न जाळतां त्याचा खत म्हणून उपयोग करतां येतो.

**गुळाच्या उत्पादनास दर आधणामागें येणारा खर्च**

**( चालू पद्धत )**

**तपशील**

( १ ) सहा लाटींचा क्रशर; हें गुऱ्हाळ दर तासी २ ते २॥ आधणाला पुरण्याइतका ऊंस पिळूं शकते.

( २ ) क्रशर फिरविण्यासाठी क्रूड ऑइलवर चालणारें एंजिन.

( ३ ) कामाचे तास रोजीं १६.

( ४ ) हंगाम १२० दिवसांचा; आधणांची संख्या ३,०००.

| मजुरीचा खर्च | रु. |
|---|---|
| फाळकेवाला | १-०-० |
| गुळव्या | १-०-० |
| आगवाला | १-०-० |
| दंडाळे | ०-८-० |
| एंजिन ड्रॉयव्हर व ऑइलमन | ०-५-० |
| मुकादम, कारकून | ०-४-० |
| चुले नीट ठेवणें, दुरुस्ती, इत्यादि | ०-८-० |
| क्रूड ऑईल | ०-१४-० |
| लुब्रिकेटिंग आईल, पट्टे | ०-३-० |
| केमिकल्स, हैड्रॉस इ. | ३-३-० |
| पडदा, एरंडेल, उडीद इ. | ०-४-० |
| पाचोळा गोळा करणें | ०-८-० |
| पाचोळा वाहतूक | १-८-० |

**घसारा**

| | | |
|---|---|---|
| एंजिन | २०,००० | रुपये |
| क्रशर | ४४,००० | ,, |
| उभारणी | ५,००० | ,, |
| एकूण | ६९,००० | रुपये |

१० टक्क्यांप्रमाणें घसारा २–४–०
इमारत, गुदाम इत्यादि
२० हजार रुपये, ६ टक्क्यांप्रमाणें घसारा
०–६–०

| | |
|---|---|
| दर आधणी एकूण घसारा | २–१०–० |
| इतर | ०–८–० |
| एकूण | ११–२–० |

गुळाच्या उत्पादनास दर आधणामागें येणारा खर्च
(नवी पद्धत)

तपशील

यंत्राची दररोज ऊंस गाळण्याची शक्ती : ५० आधणें
हंगाम: १२० दिवसांचा.

कारखान्याची यंत्रसामुग्री १,५०,००० रुपये (ह्या सामुग्रींत क्रशर, बॉइलर, कारखान्यांत उजेडासाठी लागणारी वीज २४ तास उत्पन्न करण्याचा डायनॅमो, इत्यादि सर्व कांहीं येतें.)

मजुरीचा खर्च

| | |
|---|---|
| १ एंजिनिअर दर महिना ३०० रुपये | ३००–०–० |
| १ केमिस्ट „ „ ३०० „ | ३००–०–० |
| ३ बॉइलर अटेंडेंट्स प्रत्येकीं दर महिना ७५ रुपये | २२५–०–० |
| १५ मेटस प्रत्येकीं दर महिना ७५ रुपये | १,१२५–०–० |
| २५ मजूर रोजी १–४–० प्रमाणें | ९४०–०–० |
| दर महिन्याचा खर्च | २,८९०–०–० |
| दर आधणाचा खर्च २–८–० | २–८–० |
| फाळकेवाला | १–०–० |
| रसायनें, कापड | ०–८–० |
| वंगणाचें तेल | ०–२–० |
| पट्टा इत्यादि | ०–४–० |
| पडदा इ. | ०–३–० |
| दीड लाख भांडवलावर १०टक्क्यांप्रमाणें घसारा | २–८–० |
| इतर खर्च | ०–८–० |
| एकूण | ७–१०–० |
| इमारतीवरील घसारा ५० हजारांवर ६¼ टक्क्यांप्रमाणें | ०–८–० |
| | ८–२–० |

(समाप्त)

**गोदीच्या कायद्यांत दुरुस्ती**—मुंबईमधील पोर्ट ट्रस्टच्या गुदामांतून जो माल पडून राहील त्याचा लिलांव करण्याचा अधिकार देणारें बिल हिंदच्या लोकसभेंत मांडण्यांत आलें आहे. गुदामांतून झालेली मालाची गर्दी कमी करण्याच्या दृष्टीनें ह्या कायद्याचा उपयोग होईल. उलट, व्यापाऱ्यांच्या जवळ आपला माल सांठविण्याची चांगली सोय नसल्यामुळें, त्या वर्गांत चिंतेचें वातावरण निर्माण झालें आहे.

**अन्नधान्याची आयात**—हिंदुस्थाननें गेल्या वर्षी १३० कोटी रुपयांचें अन्नधान्य परदेशांतून आयात केलें. अन्नधान्याच्या आयातीबद्दल ८ देशांशीं करार करण्यांत आले. त्यांपैकीं तीन करार पाकिस्तानशीं, दोन ऑस्ट्रेलिआशीं आणि एक एक रशिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांशीं करण्यांत आला.


कूळ कायदा
आवृत्ति २ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.
मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.
नवीन भाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.
द्विभार्या प्रतिबंधक कायदा किं. १ रु.
हिंदू घटस्फोट कायदा किं. १ रु.
शेतकरी कर्जनिवारण कायदा { कापडी किं. ४॥ रु. / कागदी किं. ४ रु.
हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.
पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.



किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवा




हूपसॅक
शाडू आयौषधि कारखाना लि. कोल्हापूर

## पूर्व व पश्चिम युरोपियन राष्ट्रांतील व्यापारी संबंध
( भा. म. का. )

युरोपांतील पूर्व व पश्चिमेकडील प्रदेश यांच्यांमधील व्यापारी संबंधाचें १९४८ सालाचें निरीक्षण केलें असतां असें अनुमान निघतें कीं ह्या दोन गटांतील देशांचे व्यापारी संबंध युद्ध–पूर्वीच्या काळाप्रमाणेंच राहातील व त्या संबंधांवर रशियाच्या धोरणामुळें विशेष परिणाम होणार नाहींत. रशियन वर्चस्वामुळें पूर्व–युरोपांतील प्रदेशांवर विशेष परिणाम होतो कीं काय अशी वाटणारी धास्ती आतां दूर झाली आहे. कारण १९४८ सालीं पूर्व–युरोपियन राष्ट्रांनीं पश्चिम–युरोपियन देशांशीं व्यापारी संबंध वाढविण्याचा प्रयत्न केला. पूर्वेकडील देशांकडून पश्चिमेकडील देशांशीं निर्यात कांहीं प्रमाणांत वाढली. गेल्या वर्षी करण्यांत आलेले निरनिराळ्या देशांतील व्यापारी करार हे वस्तूंच्या देवघेवीच्या स्वरूपाचे होते. प्रत्यक्ष रोकड पैसा द्यावा लागेल किंवा उधारी मान्य केली जाईल अशा स्वरूपाच्या गोष्टींना व्यापारी करारांत विशेषसा अवसर ठेवण्यांत आलेला नव्हता. गेल्या वर्ष अखेर ब्रिटननें पोलंड आणि झेकोस्लोव्हाकिया या दोन देशांशीं केलेला व्यापारी करार परिणामांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा आहे. ब्रिटननें हंगेरीला रोकड पैसा आगाऊ देऊन त्यांतून ब्रिटनला लागणारा शेती माल हंगेरीनें पुरवावा अशी तरतूद करण्यांत आली होती. बेल्जमनें पोलंडला भांडवली माल पुरविण्याच्या बाबतींत उधारीची सवलत दिली होती. युद्धकाळामध्यें शत्रूनें वास्तव्य केल्यामुळें परराष्ट्रांतील नागरिकांच्या मूळच्या मालमत्तेबद्दलचा प्रश्नहि परस्परांना फायदेशीर होईल अशा रीतीनें सोडविण्यांत आला आहे. कांहीं देशांत जमिनींचें राष्ट्रीयीकरण झाल्यामुळें प्रश्न थोडा नाजूक झाला होता, परंतु झेकोस्लोव्हाकिया, पोलंड सारख्या या गटांतील देशांनीं योग्य प्रमाणांत नुकसानभरपाई देण्याचें मान्य केल्यामुळें हा प्रश्न सुटला.

## हिंदमधील खर्चाच्या कांहीं आंकड्यांची छाननी
( भा. म. का. )

१९३५ च्या सुधारणा कायद्याची अंमलबजावणी एप्रिल १९४७ मध्यें झाल्यापासून प्रांतिक सरकारचें जास्त प्रमाणांत लक्ष शिक्षण व आरोग्य यांसारख्या राष्ट्रसंवर्धक खात्यांकडे जाऊं लागलें व त्याचा परिणाम म्हणून अशा खात्यांवरील खर्च कांहीं प्रमाणांत वाढूं लागला. अलिकडच्या काळांत ही परिस्थिति किती प्रमाणांत सुधारली आहे याचा विचार करण्यासाठी पुढील आकडे लक्षांत घ्यावे. १९३८–३९ सालीं अखंड हिंदुस्थानचा सर्व प्रांतांचा खर्च ८० कोटी ५२ लक्ष रुपये होता, व १९४८–४९ चा सर्व प्रांतांचा अदाजी खर्च २५८ कोटी २७ लक्ष रुपये धरण्यांत आला होता. याच काळामध्यें राष्ट्रसंवर्धक खात्यांचा म्हणजे शिक्षण, आरोग्य, सहकार व उद्योगधंदे इत्यादींचा खर्च १९३८–३९ सालीं २० कोटी ९२ लक्ष रुपये व १९४८–४९ सालीं ६८ कोटी ३६ लक्ष रुपये झाला. हे आकडे वाचतांना १९४८–४९ चे आंकडे पाकिस्तानांतील प्रांत वगळून आहेत, व महागाईमुळें खर्चाचें प्रमाण वाढतें आहे, हें लक्षांत पाहिजे. खर्च प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीनें किती प्रमाणांत वाढला असावा हें नक्की सांगतां येणार नाहीं.

१९३८–३९ सालीं हिंदुस्थानांतील प्रत्यक्ष करांचें प्रमाण सुमारें २३ टक्के होतें युद्धकाळांत व नंतर केल्या गेलेल्या अनेक बदलांमुळें प्रत्यक्ष करांचें प्रमाण आतां ५१ टक्के झालें आहे. १९३७–३८ सालीं लष्करी खर्च मध्यवर्ती सरकारच्या खर्चाच्या ४३ टक्के होता, व त्यावेळच्या एकंदर राष्ट्रीय उत्पादनाच्या मानानें २·५ टक्के होता. अद्याप लष्करी खर्चाचें प्रमाण कमी झालेलें नाहीं.

## श्री लक्ष्मी सेंट्रल को. बँक लि., फलटण
( वार्षिक सभा: ३–४–१९४९ )

फलटण संस्थान मुंबई प्रांतांत विलीन झालें, त्याचा वरील बँकेवर इतर संस्थानांतील बँकांप्रमाणें कांहीं परिणाम होणें अपरिहार्यच होतें. १९४६–४७ चे मानानें १९४७–४८ अखेर बँकेचें खेळतें भांडवल सुमारें ११ लक्ष रुपयांनीं कमी झालें आणि त्यामुळें खर्चाचें प्रमाण ·९०% झालें. तथापि, बँकेची परिस्थिति भक्कम असल्याकारणानें तिला २१ हजारांवर नफा झाला. भागीदारांना ६¼% डिव्हिडंड देण्यास ३,९२५ रु. लागतील. "विलीनीकरणामुळें बदललेल्या राजकीय परिस्थितींत या हद्दींतील शेतकरी वर्ग आणि लहान व्यापारी वर्ग यांना वाव देणाऱ्या फार मोठ्या सुसंधी बँकेपुढें आहेत. तें कार्य पार पाडण्यास तिला उत्साही आणि नेकीचे कार्यकर्ते लाभोत" असा आशीर्वाद अर्थमंत्र्यांनीं दिला आहे. बँकेस ज्या ज्या सोयी दरबारकडून मिळत असत, त्यांपैकी ज्या ज्या देणें शक्य आहे अशा सोयी बँकेस मिळत आहेत; त्याबद्दल संचालक मंडळानें आभार मानले आहेत. श्री. वि. शं. शिरपे, बी. ए., एलएल. बी., वकील, हे संचालक मंडळाचे अध्यक्ष असून श्री. श्री. ह. तळवलकर हे व्यवस्थापक आहेत.

## दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर
( वार्षिक सभा: २७–३–४९ )

१९४८ सालीं वरील बँकेस ३६ लक्ष, ६२ हजार रु. खेळत्या भांडवलावर ५३,३४८ रु. नफा झाला. बँकेचें वसूल भांडवल १ लक्ष, ८२½ हजार रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड १,२९,४५० रुपयांचे आहेत, त्यांत आतां सुमारें १२ हजारांची भर टाकण्यांत आली आहे आणि इन्व्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंड नव्यानेंच सुरू करून त्यांत ४,५०० रु. घालण्यांत आले आहेत. भागीदारांना द. सा. द. शे. रु. ८।८ प्रमाणें करमाफ डिव्हिडंड देण्यास १३,६९० रुपये लागतील. बँकेनें ७ लक्ष रु. रोख व बँकांत शिल्लक ठेवले असून ४ लक्ष रुपयांची तिची इन्व्हेस्टमेंट आहे आणि १९½ लक्ष रुपयांचीं तिनें कर्जे दिलेलीं आहेत. प्रिन्सिपॉल एस. जी. दाभोळकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें
(वार्षिक सभा १०–४–४९)

वरील बँकेस १९४८ सालीं ३९,६९९ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंडांत ८ हजारांची भर घालावी, इनकम टॅक्ससाठी १० हजारांची तरतूद करावी, सुमारें ८ हजारांचा शिलकी ऑर्गनायझेशन खर्च लिहून टाकावा व ऑर्डिनरी भागीदारांस ३% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ११ हजारांचा विनियोग करावा, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेचें खेळतें भांडवल ५७ लक्ष रुपये झाले आहे. बँकेच्या पुणें कॅन्टोन्मेंट, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड ( श्रीरामपूर ), ओझार (तांबट) व खोपोली येथें शाखा आहेत.

**हिंदी शेतकऱ्यांचें उत्पन्न**—हिंदुस्थानांतील सामान्य शेतकरी किती पैसे मिळवितो आणि खर्च करतो ह्याची चौकशी करण्यासाठी २,००० खेड्यांतून घरोघर हिंडून तपासणी करण्यांत येणार आहे. तपासणींत शेतकऱ्यांचा रोजगार, उत्पन्न, कुटुंबाचा खर्च व कर्ज इत्यादि बाबींविषयीं प्रश्न विचारण्यांत येणार आहेत. ही तपासणी हिंद सरकारच्या मजूर खात्यातर्फे करण्यांत येत असून तीसाठी १० लाख रुपये खर्च येईल. १९४८ च्या किमान वेतनाच्या कायद्यानुसार ही चौकशी करण्यांत येणार आहे.

## श्वेतवर्णीयांच्या जादा सवलती रद्द

### क्रिमिनल प्रोसीजर कोड मध्यें दुरुस्ती.

इंग्लिश लोक हिंदुस्थानचे सम्राट झाल्यावर त्यांच्या प्रभुत्वाचे व श्रेष्ठपणाचे द्योतक असे कांहीं विशेष जादा हक्क कायद्यांत त्यांना देण्यांत आले. ह्या कायद्याचा फायदा इंग्रजांप्रमाणेंच त्यांच्या अन्य श्वेतवर्णीय बांधवांना देण्यासाठी सर्व युरोपियन व अमेरिकन लोकांनाहि हे विशेष हक्क देण्यांत आले. ह्या विशेष हक्कांच्या व सवलतींच्या मुळाशीं इंग्रजांच्या प्रभुत्वाचा तोरा व श्वेतवर्णीय लोक हे काळ्या आदमींपेक्षां श्रेष्ठ आहेत ही भावना ह्या दोन गोष्टी होत्या. कोणाहि स्वाभिमानी हिंदी मनुष्यास हे जादा हक्क तिरस्करणीय वाटत असत. त्यामुळें हे जादा हक्क रद्द व्हावेत असे प्रयत्न ह्यापूर्वी तीन–चार वेळा झालेले आहेत. परंतु इंग्रजी सत्तेच्या पाठबळामुळें ते फारसे यशस्वी झाले नव्हते. आतां इंग्रजांची साम्राज्य सत्ता हिंदुस्थानांतून नाहींशी झालेली आहे. तेव्हां आतां ह्या कायद्यांना मूठमाती देण्याची व्यवस्था करणें अगदीं साहजिक आहे.

श्वेतवर्णीयांना दिलेल्या ह्या जादा हक्कांचा विशेष असा कीं गुन्हेगारी सारख्या समाजद्रोही प्रकारांना शासन करण्याचे प्रसंगीं ह्या जादा हक्कांची सवलत त्यांना मिळत होती! श्वेतवर्णीयांचे हे जादा हक्क क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या एका स्वतंत्र प्रकरणांत ग्रथित केलेले आहेत. कोर्टापुढील एखाद्या खटल्यांत फिर्यादी व आरोपी ह्यांच्यांत एखादा ब्रिटिश अथवा अन्य श्वेतवर्णीय मनुष्य असेल तर (१) त्या खटल्याचे कामीं ज्यूरी आवश्यक असेल तर ती मिश्र असावी म्हणजे तींत कांहीं श्वेतवर्णीयांचाहि समावेश असावा, (२) पन्नास रुपये दंडापेक्षां अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यांचे खटले ऐकावयास तिसऱ्या व दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटांना आणि दोन वर्षांपेक्षां अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यांचे खटले ऐकावयास फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट व सेशन्स कोर्ट ह्यांना श्वेतवर्णीयांवर अधिकार नाहीं, (३) ब्रिटिशांच्या अधिकाराबाहेरील प्रदेशांत म्हणजे उदाहरणार्थ संस्थानी प्रदेशांत हायकोर्टाकडून शरीरसंरक्षण (हेबीअस कॉर्पस) मिळविण्याचा श्वेतवर्णीयांना हक्क आहे, (४) आणि श्वेतवर्णीय बेकार भटके लोकांना प्रथमतः काम मिळवून देण्याची आणि काम देतां न आल्यास स्वतःच्या खर्चानें त्यांची त्यांच्या मायदेशीं रवानगी करण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारवर आहे, वगैरे स्वरूपाचे जादा हक्क अजूनहि श्वेतवर्णीयांना होते. त्यांना आतां फाटा देऊन हिंदुस्थानांतील सर्व मनुष्यांस कायद्याच्या दृष्टीनें समान पातळीवर आणण्यासाठीं क्रिमिनल प्रोसीजर कोडामध्यें जरूर त्या दुरुस्त्या करण्याचें एक बिल सरदार पटेलांनीं हिंदच्या पार्लमेंटांत आणलें तें पसार झाल्यावर आतां हिंदुस्थानवरील पारतंत्र्याचा एक शिलकी डाग पुसला जाणार असल्याकारणानें त्याचें सर्वत्र स्वागत होत आहे.

स. वा. वा.

अणुशक्तीचा औद्योगिक उपयोग— अमेरिकेंतील अणुशास्त्रज्ञांच्या मतानें रशिआ अणुशक्तीचा उपयोग उद्योगधंद्याला लागणारी प्रेरक शक्ती निर्माण करण्याच्या कामांत आघाडी मारण्याचा संभव आहे. ह्या शास्त्रज्ञांपैकीं दोघांनीं असा अंदाज केला आहे कीं पुढील शंभर वर्षांत अमेरिकेची प्रेरक शक्ती रशिआच्या मानानें कमी पडूं लागेल. ह्या कामीं रशिआ अणुशक्तीचा अमेरिकेपेक्षा अधिक उपयोग करूं शकेल असें त्यांचें मत आहे.


बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला




कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा–कित्तूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्टः–कृष्णा–कित्तूर जिल्हाः–बेळगांव.

विंचूरकर ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

नवीन पुष्कळ निघाले, तरी

तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.